# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,(दुसरा व चौथा मजला)
सर्व्हे नं. ८३२ -ए, फायनल प्लॉट क्रमांक १७८ व १७९ बालचित्रवाणी जवळ, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे,
भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४.

Phone No. - ०२०-२९७०९६१७/ २९७०९३९६ Email: mscepune@gmail.com Website: www.mscepune.in


जा.क्र .मरापप/बापवि/TAIT/२०२५/२२७७.
दिनांक:- ०६/०५/२०२५

प्रति,

१) मा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०००३२
२) मा. विभागीय प्रसिद्धी उपसंचालक, पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण
३) मा. संचालक, दूरदर्शन केंद्र, वरळी, मुंबई - ४०००३२
४) मा. संचालक, आकाशवाणी, मुंबई केंद्र, नवीन प्रसारण भवन, बॅकबे रेक्लेमेशन, आमदार निवासाजवळ, मुंबई - २०
५) मा.संचालक, आकाशवाणी केंद्र,पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/जळगांव/रत्नागिरी/सांगली/कोल्हापूर/सातारा/सोलापूर/नाशिक
६) सर्व जिल्हा प्रसिद्धी अधिकारी
७) मा. वृत्तपत्र संपादक

**विषय:- शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) परीक्षा - २०२५ निवेदनाबाबत.**

**संदर्भ:-** १.या कार्यालयाचे पत्र जा.क्र .मरापप/बापवि/TAIT/२०२५/२०८७.
२. या कार्यालयाची अधिसूचना जा.क्र .मरापप/बापवि/TAIT/२०२५/२०८८.
३. शासन शुद्धीपत्रक क्रमांक संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१०६/टिएनटि-१,दिनांक ०२/०५/२०२५
४. शासन पत्र क्रमांक संकीर्ण २०२२/प्र.क्र.१०६/टिएनटी-१, दि.०२/०५/२०२५.
५. या कार्यालयाचे पत्र जा.क्र .मरापप/बापवि/TAIT/२०२५/२१६७,दिनांक ०३/०५/२०२५

**महोदय,**

महाराष्ट्र शासनाच्या पत्र क्रमांक संकीर्ण २०२५/प्र.क्र.९२/टिएनटी-१, दि.२८/०२/२०२५ व मा. आयुक्त (शिक्षण), यांचे जा.क्र.आस्था-क/प्राथ १०६/टेट-३/वेप/२०२५/११९१, दि. १९/०३/२०२५ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने "शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) परीक्षा - २०२५" चे आयोजन ऑनलाईन पध्दतीने करण्यात आले आहे.

त्यानुसार उपरोक्त संदर्भ **क्र. (३)** अन्वये व्यावसायिक अर्हतेच्या अभ्यासक्रमाच्या शेवटच्या सत्रात प्रविष्ठ असणारे अथवा शेवटच्या सत्राच्या अंतिम परीक्षेस प्रविष्ठ असणारे उमेदवारही **शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) - २०२५** चे आवेदनपत्र ऑनलाईन पद्धतीने सादर करू शकतील. तरी ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याची मुदत **दि. १०/०५/२०२५ ऐवजी दि. १४/०५/२०२५ पर्यंत** वाढविण्यात आलेली आहे. तसेच B.Ed. व M.Ed., महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) परीक्षा तसेच इतर स्पर्धा परीक्षेस प्रविष्ठ असणाऱ्या विद्यार्थी/उमेदवारांची माहिती विहित नमुन्यात परीक्षा परिषदेने दिलेल्या **https://mscepune.in/DTEDOLA/TAIT2025Info.aspx** या लिंकद्वारे विहित मुदतीत सादर करावी. याबाबतचे प्रसिद्धी निवेदन यासोबत जोडलेले आहे.

सदर निवेदनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्रातून आणि आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रांनी प्रादेशिक बातम्यांचे वेळी विनामूल्य प्रसिद्धी देण्यात यावी ही विनंती.

(अनुराधा ओक)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-०४.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर:-**

१) मा. खाजगी सचिव, मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
२) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
३) मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) मा. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे-३०.
५) मा. शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
६) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत माहिती व उचित कार्यवाहीसाठी:**

१) विभागीय शिक्षण उपसंचालक सर्व
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद, सर्व.
३) शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प)

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे - ०४
# शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) परीक्षा - २०२५
## प्रसिध्दी निवेदन

महाराष्ट्र राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये पवित्र या संगणकीय प्रणालीव्दारे शिक्षक भरती करीता **शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) - २०२५** या परीक्षेचे ऑनलाईन पध्दतीने आयोजन करण्यात येत आहे. परीक्षेबाबतची अधिसूचना महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर दिनांक २५/०४/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर परीक्षेचे ऑनलाईन आवेदनपत्र सादर करण्याची मुदत **दि. १०/०५/२०२५ ऐवजी दि. १४/०५/२०२५** करण्यात येत आहे. तसेच ऑनलाईन आवेदनशुल्क भरण्याची मुदत **दि. १४/०५/२०२५ रोजी २३.५९** मि. पर्यंत राहिल.

दि. ०२/०५/२०२५ शासन शुद्धिपत्रकानुसार शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतर व्यावसायिक अर्हता अभ्यासक्रमाच्या शेवटच्या सत्रात प्रविष्ठ असणारे अथवा शेवटच्या सत्राच्या अंतिम परीक्षेस प्रविष्ठ असणारे उमेदवार यांना देखील **शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) - २०२५ परीक्षेस** प्रविष्ठ होण्यास पात्र राहतील. मात्र दि. ०५/०५/२०२५ पूर्वी आवेदनपत्र भरलेल्या उमेदवारांना सदर सुधारित तरतूदीचा लाभ घ्यावयाचा असेल तर त्यांनी पुन:श्च ऑनलाईन आवेदनपत्र भरावे. पुन:श्च भरलेले ऑनलाईन आवेदनपत्र अंतिम समजून पहिले आवेदनपत्र रद्द करण्यात येईल.

**शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) - २०२५ परीक्षा** घेण्याचे आयोजन दि. २४/०५/२०२५ ते दि. ०५/०६/२०२५ या कालावधीमध्ये करण्यात आले असून B.Ed. व M.Ed., महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) परीक्षा तसेच इतर स्पर्धा परीक्षेस प्रविष्ठ असणाऱ्या विद्यार्थी/उमेदवारांचा परीक्षा कालावधी दि. २४/०५/२०२५ ते दि. ०५/०६/२०२५ या कालावधीमध्ये नियोजित असेल तर अशा विद्यार्थी/उमेदवारांनी आपली माहिती विहित नमुन्यात परीक्षा परिषदेने दिलेल्या https://mscepune.in/DTEDOLA/TAIT2025Info.aspx या लिंकद्वारे दि. १४/०५/२०२५ पर्यंत सादर करावी. जेणेकरुन शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी परीक्षा (TAIT) - २०२५ परीक्षेला प्रविष्ठ असलेल्या उमेदवारांचे परीक्षेच्या बॅचेसचे नियोजन करणे सुलभ होईल.

उमेदवारांनी वर दिलेल्या लिंकद्वारे विहित मुदतीत माहिती सादर न केल्यास उमेदवार परीक्षेपासून वंचित राहिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहिल.

**ठिकाण: पुणे**
**दिनांक: ०६/०५/२०२५**

**(अनुराधा ओक)**
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे -०४